(महाराष्ट्र शासन)

# राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,

शेंडापार्क, कोल्हापूर-416013

दुरध्वनी :- ०२३१ - २६४१५८३ फॅक्स क्र. :- ०२३१ - २६४५२७९

जा.क्र.राछशामशावैमको/आस्था-१,२/करार रिक्त पदे/ ३५९१ /२०२६ दिनांक ०२/७/२०२६

**थेट मुलाखत**

**विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,कोल्हापूर येथील मनोविकृतीशास्त्र व क्षकिरणशास्त्र विषयातील सहाय्यक प्राध्यापक,यांचे रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे भरण्याबाबत...**

**संदर्भ:- महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३,दि.१८.०७.२०२४**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,कोल्हापूर या संस्थेत मनोविकृतीशास्त्र व क्षकिरणशास्त्र विषयातील रिक्त असलेले सहाय्यक प्राध्यापक पद संदर्भिय शासन आदेशांन्वये **सहाय्यक प्राध्यापक करार पध्दतीने (DSB) १२०/३६४ दिवसांकरिता** भरण्याबाबत थेट मुलाखत घेण्यात येत आहे. थेट मुलाखत अधिष्ठाता कार्यालय,महाविद्यालयीन परिषद कक्ष राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडापार्क, कोल्हापूर येथे दिनांक ०८.०७.२०२६ रोजी बुधवार दुपारी ०३.०० वा.घेण्यात येतील.

तरी इच्छूक उमेद्वारांनी शैक्षणिक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह आपला अर्ज दि.०३.०७.२०२६ ते दि.०६.०७.२०२६ अखेर राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,कोल्हापूर शेंडापार्क येथील आवक विभाग (Inward) मध्ये सादर करावा. तसेच उमेदवारांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडापार्क, कोल्हापूर येथे दिनांक ०८.०७.२०२६ रोजी बुधवार दुपारी ०३.०० वा स्वखर्चाने उपस्थित रहावे. सदर पदे भरण्याबाबतचे नियम व अटी प्रचलीत शासन निर्णयानुसार राहतील.

**Assistant Professor (Contract Basis 120/364 Days)**

| Sr. No. | Subject | Qualification | Total | Institute Name |
|---|---|---|---|---|
| 1 | Psychiatry | As per NMC Norms | 1 | RCSMGMC Kolhapur |
| 2 | Radiology | | 1 | |
| | **Total** | | **2** | |

सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी NMC मानकांनुसार पदवी/डी.एन.बी. अर्हता धारण केलेले बंधपत्रीत उमेदवाराचा प्राधान्याने विचार केला जाईल. उमेदवाराची निवड गुणांनुक्रमे व प्रयत्न (No.of Attempts) विचाराता घेऊन करण्यात येईल.

अ) शैक्षणिक अर्हता :- NMC मानकांनुसार

ब) वयोमर्यादा(सहाय्यक प्राध्यापक) :-**खुल्या वर्गासाठी - ३८ वर्षे(जाहिरात प्रसिद्धी दिनांका रोजी गणली जाईल)**

(सहाय्यक प्राध्यापक) :- **मागासवर्गीयांसाठी - ४३ वर्षे (जाहिरात प्रसिद्धी दिनांका रोजी गणली जाईल)**

क) वेतनश्रेणी:- सहाय्यक प्राध्यापक पदासाठी-**एकत्रित ठोक मासिक मानधन रु.१,००,०००** (रु.एक लाख **फक्त**)

**नियम व अटी**

१) अर्जदार हा सबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. नियुक्तीनंतर उमेदवारास वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र ३ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

२) सदर रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

३) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष /अप्रत्यक्षरित्या कोणताही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

४) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

५) अर्जदाराची नियुक्ती संचालनालयाकडून बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध होईपर्यत तात्पुरत्या स्वरुपाची असून जर शासनातर्फे निवड मंडळामार्फत/नामनिर्देशनाने/बदली अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत कायम स्वरुपाच्या उमेदवसारास रुजू करण्यांत आलेस अर्जदाराची त्या पदावरील सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

६) अर्जदार इतर कोणत्याही शासकिय/अशासकिय संस्थेत कार्यरत असल्यास त्यांनी कार्यरत असलेल्या संस्थेचे ना-हरकत(NOC) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल.

७) सदर नियुक्ती ही तातुरत्या स्वरुपात असुन या पदावर आपला कोणताही अधिकार रहणार नाही तसेच याबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

उमेदवारांनी विहित कालावधीत (दि.०२.०७.२०२६ ते दि.०६.०७.२०२६ अखेर) आपला अर्ज शैक्षणीक कागदपत्रांसह (सोबत जोडलेल्या अर्जानुसार) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर शेंडापार्क येथील आवक विभाग (Inward) येथे जमा करावेत.तसेच थेट मुलाखत दिनांक ०८.०७.२०२६ रोजी दुपारी०३.०० वाजता अधिष्ठाता कार्यालय, महाविद्यालयीन परिषद कक्ष रा.छ.शा.म.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडापार्क, कोल्हापूर यांचे कक्षात होईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घावी. **सदरच्या जाहिरातीतील पदसंख्या बदलण्याबाबतचा अथवा सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठातांनी राखून ठेवला आहे.**

(डॉ.एस.एस.भिसे)
अधिष्ठाता,
राजर्षी छत्रपती शाहू महाराज,
शासकीय वैद्यकीय महाविदयालय, कोल्हापूर

प्रति,

१)सूचना फलक, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविदयालय, कोल्हापूर.
२)सुचना फलक,वैद्यकिय अधिक्षक कार्यालय,छ.प्र.रा.स.रु.कोल्हापूर.
३) सर्व प्राध्यापक व विभागप्रमुख, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविदयालय, कोल्हापूर.
४) मुलांचे/मुलींचे/आवासी-निवासी वसतीगृह, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शा.वै.म., कोल्हापूर.
५) ग्रंथालय सूचना फलक, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविदयालय, कोल्हापूर
६) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये :-
महाविद्यालयाचे नांव :-
(उपरोक्त अधिष्ठातांना विनंती करण्यात येते की, सदरची जाहिरात आपल्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावावीत.)

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

१) मा.अप्पर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
२) मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई - १
३) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई - १
४) मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
५) मा.उपसंचालक आरोग्य सेवा, कोल्हापूर